# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेस नोट** दिनांक १२/११/२०२०

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवर कोरोना कालावधीत कर्तव्य बजावताना कोव्हिड-१९ या संसर्गाने मयत झालेल्या पिंपरी चिंचवड पोलीस दलातील पोलीस अमंलदार यांचे कुटूंबियांना स्वनुग्रहन अनुदान वाटप केले बाबत.**

आज दिनांक १२/११/२०२० रोजी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या प्रांगणात कोरोना कालावधीत कोव्हिड-१९ या संसर्गाने मृत्यु पावलेल्या पोलीस अमंलदार यांचे कुटूंबियांना मा.श्री.कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांचे हस्ते स्वनुग्रहन अनुदान वाटप करण्यात आले.

या कार्यक्रम वेळी मा.श्री.कृष्ण प्रकाश सो, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड यांनी पोलीस अमंलदार यांचे कुटूंबियांना आपले पती/वडील हे लोकांची सेवा करत असताना ते मृत्यु पावले आहेत कोरोना महामारीच्या काळात त्यांनी जनतेच्या सेवेसाठी उत्कृष्ठ कर्तव्य बजावले आहे. असे सांगुन पोलीस अमंलदार यांचे कुटूंबियांच्या दु:खाचे सांत्वन करत त्यांचे मनोबल वाढवले. तसेच कुटूंबियांना शासनातर्फे रुपये ५० लाखांचे अनुदान तसेच पोलीस कल्याण निधीतून रुपये १० लाखांचे अनूदान वाटप करण्यात येत असल्याचे मा.पोलीस आयुक्त कृष्ण प्रकाश यांनी मयत पोलीस अमंलदार यांचे कुटूंबियांना यावेळी सांगितले. या अनुदानाचा वापर आपल्या मुलांच्या चांगल्या भविष्यासाठी करावा व चांगली गुंतवणूक करा असे अवाहन उपस्थित कुटूंबियांना यावेळी केले.

मा.श्री.रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी कोरोना संसर्गाच्या काळात पिंपरी चिंचवड कोरोना सेलने कोरोना बाधीत पोलीस अधिकारी व अमंलदार यांचेशी व तसेच त्यांचे कुटूंबियांशी योग्य समन्वय साधत योग्य उपचार उपलब्ध करुन देत आपले कर्तव्य उत्कृष्ठरित्या बजावले आहे. त्यामुळे अनेक पोलीस अधिकारी व अमंलदार यांचे जीव वाचविण्यास यश आले आहे. पिंपरी चिंचवड आयुक्तालयातील पोलीस अधिकारी व अमंलदारांचे आरोग्य चांगले राहावे तसेच कठीण काळातही त्यांना अधिकाधीक उत्कृष्ठ काम करुन कर्तव्य बजावता यावे, त्यांची रोगप्रतिकार शक्ती वाढावी यासाठी सी-व्हिटॅमिन तसेच झिंकच्या गोळया, एन-९५ मास्क, हातमोझे, फेसशिल्डचे वाटप करण्यात आले आहे. आजरोजी पर्यंत पिंपरी चिंचवड पोलीस दलातील ५१५ पोलीस अधिकारी व अमंलदार कोराना बाधीत झाले आहेत परंतु बाधींताचे प्रमाण पाहता मृत्युचे प्रमाण कमी करण्यात पिंपरी चिंचवड कोरोना सेलला यश आले आहे. पुढील काळातही आम्ही अशीच खबरदारी घेवून पोलीस अधिकारी व अमंलदार यांचेसह पोलीसांच्या कुटूंबियांची सुद्धा योग्य ती काळजी घेत असल्याचे सांगितले.

मा.श्री. सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त गुन्हे यांनी यावेळी कोरोनाच्या काळात पोलीसांसाठी व त्यांचे कुटूंबियांसाठी कोरोना संसर्गाच्या उपचारासाठी हद्दीतील दवाखाने यांचेशी समन्वय साधून औषध सामुग्रीचे योग्य नियोजन करण्यात येत आहे पुढील काळात पोलीसांसाठी कल्याणकारी योजना राबवत आहोत असे उपस्थितांना यावेळी सांगितले.

या कार्यक्रम प्रसंगी मा.पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश यांचेसह अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे श्री. सुधीर हिरेमठ, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे श्री.आर.आर. पाटील कोरोना सेलचे पोलीस अधिकारी श्री.अनिल लोहार व त्यांची सुपंर्ण टिम आणि तसेच मृत्यु पावलेले पोलीस हवालदार कै.संतोष प्रताप झेंडे यांची पत्नी नाव- मंगल संतोष झेंडे व मुलगा तनिष्क संतोष झेंडे, पोलीस हवालदार कै. अंबरनाथ रामचंद्र कोकणे यांची पत्नी नाव- सुंदराबाई अंबरनाथ कोकणे व मुलगा प्रदिप अंबरनाथ कोकणे आणि पोलीस नाईक कै.रमेश वामण लोहकरे यांची पत्नी नाव- प्रमिला रमेश लोहकरे व मुलगी क्षमिक्षा रमेश लोहकरे हे उपस्थित होते.

**सदर या छोटेखानी कार्यक्रम प्रसंगी सोशल डिस्टन्सींगचे तंतोतंत पालन करण्यात आले होते.**





